
# वासुदेववाग्वेणू

डॉ. उमा वैद्य



॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

## आमचा प्रेरणास्त्रोत




प. पूज्य लीलाताई कर्वे, बदलापूर

### श्री द्वारकाधीश मंदिर

ॐ साईहरीक्षेत्रात द्वारकाधीशाचे भव्य मंदिर बदलापूरच्या कृष्णभक्त पूज्य लीलाताई कर्वे यांची प्रेरणा व आशिर्वादातूनच उभे राहीले. १९९० साली ताई सर्वप्रथम साईहरीक्षेत्री आल्या, त्यावेळी त्यांनी या भूमीचा पुढे खूप उत्कर्ष होणार आहे असे सूचित केले होते. साईहरीक्षेत्रात द्वारकाधीशाच्या आगमनाची जणू ती नांदीच होती. पुढे १९९६ साली हरिचे अर्थातच द्वारकाधीशाचे साईहरीक्षेत्री मोठया दिमाखात आगमन झाले. द्वारकाधीशाची सुंदर संगमरवरी मूर्ती खास जयपूरहून आणण्यात आली. मंदिराच्या उभारणीचे काम सुमारे दीड वर्षात पूर्ण झालं. मंदिर उभारणीत देशातील व परदेशातील असंख्य कृष्णभक्तांचा हातभार लागला. १२ डिसेंबर १९९६ ला भगवान द्वारकाधीशाची पूज्य लीलाताईंच्या हस्ते विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा झाली. श्रीकृष्णलीला ध्यानमंदिराचे उद्‌घाटन श्रेष्ठ स्वामीभक्त पूज्य नाना महाराज परांजपे यांनी ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायाचे वाचन करून केले. ध्यानमंदिर षटकोनी आकाराचे असून इथले पावित्र वातावरण, नीरव शांतता ध्यानधारणेसाठी अत्यंत पोषक आहे. ध्यानमंदिरात विविध धर्मग्रंथाचा संग्रह असून भक्तांना त्यांची पारायणे वा वाचन करता यावे अशी त्यामागील भावना आहे. द्वारकाधीश मंदिरात महाशिवरात्री, रामनवमी व श्रीकृष्ण जन्माष्टमी असे तीन महत्वाचे उत्सव साजरे केले जातात. गोपाळकाल्याचे दिवशी दहीहंडीचा कार्यक्रम असतो. आजूबाजूचे गावातील गोविंदा येऊन रिंगण धरून नाचतात व दहीहंडी फोडतात. द्वारकाधीशासमोर आजवर संगीत क्षेत्रातील प्रसिध्द गायक व गायिकांनी आपली संगीत

( पुढील मजकुर मलपृष्ठ ३ वर )



योगेश्वर कृष्ण
कृष्णकुटीर, बदलापूर

# वासुदेववाग्वेणू

डॉ. उमा वैद्य

- **प्रथम आवृत्ती :**
  २६ डिसेंबर २००१ - गीता जयंती


- © श्री द्वारकाधीश चॅरीटीज


- **प्रकाशक :**
  श्री द्वारकाधीश चॅरीटीज
  साईहरीक्षेत्र, आपटा फाटा,
  कर्नाळा, जि. रायगड.

- **मुखपृष्ठ :**
  शलाका ॲडव्हर्टायझिंग

- **मुद्रक :**
  शलाका ॲडव्हर्टायझिंग,
  ९३/९५, बजारीया चेंबर्स,
  दुसरा मजला,
  बजार गेट स्ट्रीट,
  फोर्ट, मुंबई - ४०० ००१

- **संगणक अक्षर रचना :**
  श्री. भालचंद्र लागू
  प्रतिभा डी.टी.पी. सेंटर,
  ब्राम्हण वाडी, कुर्ला (प.) मुंबई

- मुखपृष्ठावरील छायाचित्र :
  **श्री द्वारकाधीश**
  श्री व्दारकाधीश मंदिर,
  साईहरीक्षेत्र, आपटा फाटा,
  कर्नाळा, जि. रायगड.

- **मूल्य - २५ रुपये**

# मनोगत

माझ्या आयुष्यातील एका परमभाग्याच्या क्षणी ताईंनी गीतेची एक अगदी लहान, डबीएवढी प्रत माझ्या हाती दिली आणि म्हणाल्या, 'ही जवळ ठेव. ही भगवन्ताची 'वाङ्‌मयी मूर्ति' आहे'. 'भगवन्ताची वाङ्‌मयी मूर्ती' माझ्याजवळ आहे ही केवळ कल्पनासुद्धा मला धन्य करुन गेली. वास्तविक गोपाळकृष्ण हे माझ्या माहेरचे आराध्य दैवत ! माझ्या आजीच्या तोंडून 'भगवान् गोपालकृष्णा' असे उद्‌गार दररोज कित्येकवेळा निघत असत. प्रतिदिवशी गीतेचे अठराही अध्याय भोजनापूर्वीच म्हणण्याचा तिचा परिपाठ होता. माझा अभ्यासाचा विषय संस्कृतच असल्याने मीही महाविद्यालयीन अभ्यासात गीतेचा परीक्षेसाठी अभ्यास केला होता आणि त्यावेळी हे लक्षातही आलं नव्हतं की, ह्या एकाच परीक्षेसाठी नव्हे तर आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक परीक्षेसाठी गीतेचा हा अभ्यास उपयोगी पडणार आहे. म्हणजे खरं तर गीतेचा व माझा परिचय बालपणापासूनचाच ! ह्या परिचयाचे धागेदोरे अनेक कारणांनी बळकट बनत गेले. कधी विद्यार्थ्यांना शिकवायचं म्हणून गीता अधिकाधिक उलगडत गेली, तर कधी कोणी परिचिताने गीतेची मराठी समश्लोकी केली, ती तपासून दिली. आणि हळूहळू त्या परिचयाच्या धाग्यांचे रेशमी धाग्यात रुपान्तर झाले. वय वाढता वाढता यश आणि अपयश अशा दोन्ही तीरांवर आयुष्याची नौका हेलकावे खाऊ लागली आणि त्यावेळी मात्र गीता हे वादळी वाऱ्यांपासून संरक्षण करणारं अभेद्य कवच बनलं ! यशानं मातू नये, अपयशानं उतू नये, कवचाच्या आत राहून तटस्थ विचार करावा हे गीतेनं शिकवलं ! मी गीता का वाचते ह्या प्रश्नाची अनेक उत्तरं आहेत. कारण गीता हेच अनेक प्रश्नांचं एक निश्चित उत्तर आहे. हे प्रश्न केवळ मलाच आणि आज-आताच पडलेले नाहीत. हे प्रश्न पार्थापासून सर्वांना,

मला आणि तुम्हालासुद्धा पडलेले आहेत. हे प्रश्न भूतकाळात होते, वर्तमानकाळात आहेत आणि भविष्यातही राहतील. म्हणूनच गीतेनं दिलेली उत्तरं कालातीत आहेत. हे प्रश्न केवळ भारतातील समाजाचे नाहीत तर पाश्चिमात्य, अभारतीय समाजाचेही आहेत. म्हणूनच गीतेच्या वाचनाने जी शान्ती मिळते तिचे वर्णन शॉपेनहॉवर अशा शब्दांत करतो की, (***Geeta is the highest solace of my life.***) 'गीता हे माझ्या आयुष्यातील सर्वश्रेष्ठ विश्रांतिस्थान आहे'.

**डॉ. उमा वैद्य.**

# वासुदेववाग्वेणू

'भगवता स्वयमेव गीता' - 'भगवंताने स्वतःच गायिलेली' ह्या अर्थाने 'गीता' ही भगवद्गीता आहे. साक्षात् ईश्वराने स्वतःच्या मुखाने पार्थाला केलेला हा उपदेश पूर्ण जगाला एक दिव्य तत्त्वज्ञान देऊन गेला आहे. गीता ही कोणी, कोणाला आणि केव्हा सांगितली ही सर्व कथा आपल्या ठाऊक आहेच आणि ती कथा गीतेचा इतिहास म्हणून कायमच रहाणार आहे, बदलणार आहे ते फक्त 'गीता' का सांगितली ह्या प्रश्नाचं उत्तर ! गीता अर्जुनाला का सांगितली याचं उत्तर व्यासांनी पहिल्या अध्यायात दिलंच आहे. पण आज सुमारे सहा हजार वर्षांनंतर सुद्धा आपण गीता का वाचावी ह्याचं उत्तर शोधण्याचा मी प्रयत्न करते आहे; आणि तुमच्यापुढे मांडते आहे. मी गीतेची मोठी अभ्यासक नाही, 'गीतारहस्य' मला समजलंय असा माझा दावाही नाही पण तरीही नियमानं गीतेचा १२वा आणि १५वा अध्याय म्हणावा असं मला कां वाटतं याचा जेव्हा मी विचार करते तेव्हा गीतेचा आजच्या युगातला संदर्भ कोणता हे माझ्या लक्षात येतं ! गीता हे कर्मज्ञानभक्तियोगाचं गहन असं केवळ तत्त्वज्ञान नव्हे तर आपल्या दैनंदिन जीवनातील व्यावहारिक प्रश्नांचं उत्तर देणारे ते मार्गदर्शक पुस्तक म्हणजे गाईड आहे. मानवी जीवनाच्या काही समस्या देश, काल किंवा समाज बदलला तरी सारख्याच असतात. अर्जुनाला फक्त युद्ध करु की नको एवढाच प्रश्न पडला, हॅम्लेटला सरळ जगू की नको ? (***To be or not to be ?***) असा प्रश्न पडला. एकूण काय तर प्रश्नांचा तपशील बदलतो पण त्यांचं गांभीर्य कायमच असतं ! अशा वेळी गीता आपली मार्गदर्शिका बनते.

गीतेची रचना सहा हजार वर्षांपूर्वी झाली असली तरी अर्वाचीन

संदर्भात ती जराही उणी नाही म्हणूनच ह्या बदलत्या युगातही गीता आवर्जून वाचावी. सर्व भौतिक सुखे पैशाने विकत मिळतात पण मनःशान्ती विकत मिळत नाही. सुखे ही बाहेरुन लादली जातात तर मनःशान्ती आतून उमलून यावी लागते. ही मनःशान्ती म्हणजे साक्षात् चित्कलाच, पण उमलून यायला फार वेळ लावते, तिला वेद-उपनिषदांच्या विचारांचे खत लागते, कर्मयोगाची शिंपण लागते. पण हे सामान्य माणसाच्या आवाक्यापलिकडचं आहे. म्हणूनच श्रीकृष्णानं उपनिषदांचं सार गीतेत मांडलं आणि कर्मयोगाचं अवघड तत्त्वज्ञान सोपं करुन सांगितलं ! सर्व उपनिषदं ह्या गाई आहेत, दोहन करणारा गोपाल-नन्दन आहे, अर्जुन हा वत्स (वासरु) आहे, त्यासाठी हे गीतामृतरुपी दूध काढलं जात आहे.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।

ह्या कृष्णाच्या अंगी नाना कला आहेत. यशोदेचं ते द्वाड व्रात्य पोर आहे, राधेचा शाम आहे, कंसचाणूरांचा तो साक्षात्काळ आहे ! कोणाचा कोण तर कोणाचा कोण, एकच चैतन्य अनेक रुपांत साकारलेलं, पण गीतेच्या वाचकांसाठी मात्र तो उत्तम तत्त्वज्ञानी आणि श्रेष्ठ शिक्षक आहे. अत्यंत कठीण विषय, सहज समजेल अशा भाषेत सांगण्याची त्याची पद्धत विलक्षण आहे. रणांगणावर, ऐन युद्धाच्या धुमश्चक्रीत विषण्ण, विकल झालेल्या आणि धनुष्य टाकून देणाऱ्या, क्षात्रधर्माच्या लोपाची जाणीवच नष्ट झालेल्या अर्जुनाला पुन्हा युद्धाला उभं करणं ही गोष्ट सोपी नाही. आजार विकोपाला गेलेला आहे, औषधही परिणामकारकच हवं पण तरीही सारं काही आजाऱ्याच्या कलाकलानंच घ्यायला हवं ! सुदैवानं अर्जुनाची ऐकण्याची तयारी आहे. ज्ञानमार्गाची पहिली पायरी आहे, 'शुश्रुषा'- काही

ऐकावं अशी इच्छा ! ह्या पायरीवर उभे असाल तरच ज्ञानसोपान चढता येईल. म्हणूनच अर्जुन हात जोडून पुढे वाकला आहे आणि नम्रपणे विनवितो आहे - **'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्'**। (अ.२.७) येथून गुरुशिष्यसंवादाला सुरुवात झाली. गीतेची ही संवादशैली मनाला भुरळ घालते. संवादशैलीचे अनेक गुण असतात. ह्यात संवाद करणाऱ्या दोन व्यक्तींमधील मानसिक अंतर कमी करण्याची ताकद असते. गुरूची विद्वत्ता आणि शिष्याचे अज्ञान यातील दरी सहज पार होते ती संवादामुळे. खरा तर अर्जुन वय, ज्ञान, नातं ह्या साऱ्यानंच कृष्णापेक्षा लहान, पण अर्जुन त्याचा भक्त आहे तेवढाच मित्रही आहे. **'हे कृष्ण, हे माधव, हे सखेति'**, अशा शब्दांत अर्जुन आपल्या मित्राला साद घालतो आहे आणि विश्वरूपदर्शनानंतर आपल्या सख्याचं मोठेपण समजल्यावर आपण केलेल्या बरोबरीनं शरमून जातो आहे. कृष्णही मित्र असला तरी मित्रत्वाच्याच नात्यानं चार गोष्टी सुनावतो आहे. 'एक तर ज्याचा शोक करु नये त्याचा शोक करतोस आणि वर शहाणपणाच्या गोष्टी मला सांगतोस' - **'अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे'** । (अ. २.११) - किती सहज बोलणं पण खोट्या शहाणपणाला दिलेली हलकीशी चपराकसुद्धा ! गुरुशिष्याच्या नात्याची ही जवळीक पण तरीही वेळीच चूक दाखविणारी ! हे गहन तत्त्वज्ञान समजावून घेण्याची अर्जुनाची ताकद कृष्णाला ठाऊक आहे पण म्हणून अर्जुनाला ते समजलं आहे असं नाही. ते समजावण्यासाठी हा सारा गीतेचा प्रपंच ! कधी समजावणी तर कधी दटावणी आणि साऱ्याचा अपेक्षित परिणाम, ७०० श्लोकांचं फलित **'करिष्ये वचनं तव'** । (अ. १८.७३) - 'आता तू म्हणशील तसे करेन', पण ही असहाय शरणागती नव्हे - ज्ञानातून उत्पन्न झालेला विनय, सुरवातीचा अज्ञानमूलक ताठा नाहीसा होऊन ज्ञान देणाऱ्या गुरूच्या पायी विनम्र नमस्कार !

कोणत्याही माणसाच्या आयुष्याची कर्म भक्ती आणि ज्ञान हीच त्रिसूत्री असते, मग तो माणूस भारतीय असो किंवा परकीय ! आयुष्यभर माणसं काम करतात, ज्ञान मिळवितात, ऐहिक समृद्धी मिळवितात आणि तरीही मनोमन असंतुष्टच रहातात तेव्हा ईश्वराला शरण जाऊन त्याची भक्ती करू लागतात. ह्या तीनही घटकांना स्वतःचं महत्त्व आहेच पण ह्यातला कोणताही एकच घटक पुरेसा नाही. ह्या तिघांचा समतोल असायला हवा म्हणूनच समजत्या वयात आयुष्याची नीट आखणी करायला हवी. काम करायचं, ज्ञान मिळवायचं, पैसा कमवायचा पण हे सारं 'त्याचं' आहे असं समजून त्याच्याच भक्तीत रंगून जायचं, मनातले सारे तणाव विसरून जायचे ! गीतेतलं 'तत्त्वज्ञान' हे आत्मज्ञान आहे. ते काही सहजसाध्य नव्हे आणि त्यातूनही आपली वयं, ध्येयं आणि वाढती भोगवादी प्रवृत्ती यामुळे आताच आत्मज्ञानाविषयी काही अधिकारवाणीनं बोलावं असं नाही पण गीतेच्या ह्या तीन तत्त्वांचा आपल्यापुरता काही अर्थ लावून पाहू या !

माझ्या दृष्टीने गीता हे जेवढे तत्त्वज्ञान आहे त्याहूनही अधिक ते उत्तम मानसशास्त्र आहे. मानवी मनाच्या सूक्ष्म व्यापारांचा अभ्यास करून कृष्णाने अर्जुनाला विलक्षण पद्धतीने युद्धास प्रवृत्त केले. खरं तर, 'अर्जुनाच्या मनात असा विषाद निर्माण झालाच कसा असा कृष्णालाच प्रश्न पडला आहे. हे कश्मल (काजळी- युद्ध न करण्याचा निश्चय) तुझ्या मनात आलंच कुठून ? आणि हे अशा अवेळी ? हे आर्यांना शोभणारं नाही कारण ते तुला अपयशाचे धनी करेल', अशा प्रकारे अगदी प्रथमपासूनच अर्जुनाच्या निर्णयाबाबत कृष्णाने नाराजी व्यक्त केली आहे. त्यानंतर मात्र सरळसरळ तत्त्वज्ञान- चर्चेलाच सुरवात आहे. 'स्वजनांना ठार मारून मी कसा सुखी होईन रे' ? **'स्वजनं हि कथं हत्त्वा सुखिनः स्याम माधव'** । (अ. १.३७) अगदी सहज स्वाभाविक प्रश्न पण उत्तरही तेवढंच चतुर ! 'मी मारणारा

आहे आणि ते मरणार आहेत' ह्या दोन्ही धारणाच चुकीच्या आहेत. पहिल्या ठिकाणी वृथा अहंकार आहे आणि दुसऱ्या ठिकाणी आत्मतत्त्वाविषयीचे अज्ञान आहे. मारणारा तू नाहीस, ते आपल्याच मरणाने मरतील, तू फक्त निमित्तमात्र हो ! त्यांची नियती निश्चित आहे, त्यानुसार घडणारच आहे. फक्त ते तुझ्या हातून घडविले जाणार आहे म्हणून 'मी हत्यारी आहे' अशा भ्रमात राहण्याचे कारण नाही. दुसरे असे की, ते मरतील म्हणजे त्यांचा केवळ देहपात होईल, आत्मा मरत नसतो, तो कोणाला मारतही नसतो **'नायं हन्ति न हन्यते'** । (अ. २.१९) तेव्हा युद्ध करण्याविषयीची पहिली भीती निरर्थकच ठरली ! पण इतक्या सहजपणे अर्जुन थोडाच मानणार आहे ? आणि म्हणूनच श्रीव्यासांना सांख्ययोगाचं पूर्ण तत्त्वज्ञान सांगण्याची संधी मिळाली आहे. भारतीय आस्तिकदर्शनाचं, विशेषतः सांख्य आणि योगाचं तत्त्वज्ञान त्यांनी व्यावहारिक संदर्भात समजावून सांगितलं आहे. केवळ तत्त्वज्ञान हा सामान्य माणसाच्या आवडीचा विषय नव्हे, मनोरंजक तर मुळीच नव्हे पण प्रत्येकाच्या जीवनात उभ्या रहाणाऱ्या प्रश्नांच्या संदर्भात विचार केला तर ते रुक्ष तत्त्वज्ञान रहात नाही तर जीवनाच्या यशस्वितेचं रहस्य बनून जातं ! जे फळ सांख्यतत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने मिळते तेच फळ योगाच्याही अभ्यासाने मिळते. सांख्य आणि योग दोन्ही एकच आहेत हे ज्याला कळले त्यालाच खरे जीवनाचे रहस्य कळले. सांख्यतत्त्वज्ञान हे सिद्धान्तांचे विवेचन करते म्हणजेच ते **'प्रमेय-प्रधान'** (***Theoretical***) आहे तर योग-तत्त्वज्ञान हे **'प्रयोग-प्रधान'** (***Practical***) आहे. कोणत्याही घटनेच्या ह्या दोन बाजू असतातच. म्हणून सांख्ययोग जाणणे म्हणजे समतोल विचार करणे. ह्या दर्शनांचे ग्रंथातील सिद्धान्त कोणते, ते आपल्याला पटतात किंवा नाही हा भाग निराळा पण कृष्ण जेव्हा अर्जुनाला सांख्ययोगाचा उपदेश रणांगणावर, युद्धासाठी सैन्य पुढे ठाकले असताही करतो तेव्हा त्याचा उद्देश केवळ तात्त्विक रुक्ष विवेचन एवढाच निश्चित नव्हता तर

समोर उभ्या ठाकलेल्या समरात, कर्तव्य आणि भावना ह्या द्वंद्वात सापडलेल्या अर्जुनाने स्वतःच निश्चय करुन योग्य तो मार्ग निवडावा ह्यासाठी कृष्ण त्याला सारासार विचार करायला मदत करतो; आणि स्थिरपणे विचार करणारा 'स्थितप्रज्ञ' कसा हेही समजावतो. एखाद्या थोर व्यक्तीविषयी, त्याच्या आचरणाविषयी सामान्य माणसाच्या मनात विलक्षण कुतूहल असतं ! अर्जुनही बालकाच्या निरागसपणे विचारतो, 'अरे, तू स्थितप्रज्ञ, स्थितप्रज्ञ म्हणतोस खरा पण तो बोलतो कसा, बसतो कसा, चालतो कसा ?' अर्जुनाचा प्रश्न स्थितप्रज्ञाच्या बाह्यदर्शनासंबंधी आहे पण स्थितप्रज्ञता ही मनाती स्थिती आहे; ती दिसायची नव्हे, समजावून घ्यायची गोष्ट आहे म्हणून श्रीकृष्ण स्थिरबुद्धीं माणसाचं सविस्तर वर्णन करतो. सर्वप्रथम माणसाचं त्याच्या इन्द्रियांवर नियंत्रण हवं. माणसाची ज्ञानेन्द्रिये काय किंवा कर्मेन्द्रिये काय मोकाट सुटलेल्या अश्वांसारखी असतात, सतत कुरणांच्या म्हणजेच उपभोगांच्या दिशेने धावत असतात. त्यांना लगाम लावून योग्य मार्गावरुन न्यावं लागतं, ताब्यात ठेवावं लागतं ! हा लगाम बुद्धीचा असतो. भावनेच्या आहारी जाणारं मन विकारी असते पण बुद्धी मात्र विचारी असते. मनावर नियंत्रण हेच समाधानी जीवनाचं रहस्य आहे.

अर्जुनाच्या मनात जो संघर्ष चालू आहे त्याचा विचार केला तर असं वाटतं की, आपल्याही मनात मन आणि बुद्धी यांचा संघर्ष नेहमीच चालू असतो. कित्येकदा मनाला जे करावंसं वाटतं त्याला बुद्धी साथ देत नाही. समस्या ह्या केवळ बाह्य घटक असतात. संघर्ष असतो आपल्याच एका मनाचा दुसऱ्या मनाशी किंवा बुद्धीशी. स्वजनांच्या हत्येचं पातक माथी येईल म्हणून किंवा मला रक्तरंजित उपभोग नकोत म्हणून अर्जुन युद्ध करणं नाकारतो. यात क्षत्रिय धर्माचं उल्लंघन तर आहेच पण त्याच्या ह्या निर्णयानं संपूर्ण समाजाची घडीच विस्कटून जाणार आहे. जर हे युद्ध

झालं तर केवढा अधःपात होईल ह्याचं वर्णन अर्जुन करतो आणि कृष्ण त्याला लगेच सांगतो की, 'हा विचार आणि हे वर्तन तुला मुळीच शोभणारं नाही. युद्धात मरण आलं तर स्वर्गाला जाशील, जिंकलास तर राज्य भोगशील पण जर युद्धच न करशील तर लोक तुला भ्याड समजतील, तुझ्या वाट्याला अपकीर्तीच येईल. तर मनाची ही दुर्बलता टाकून युद्धाला सज्ज हो'. हे पार्थाला सांगणारा कृष्ण आपल्यालाही कानमंत्र देऊन ठेवतो नुसत्या विचाराने येणारी निष्क्रियता टाकून द्या. समाजाचं हित ज्यात आहे ते काम करायलाच हवं, मग वैयक्तिक पापपुण्याचा अडसर त्यात आडवा येता कामा नये.

मानवी जीविताला सर्वात मोठी भीती मरणाची आहे, पण ही भीती अर्जुनाच्या मनातून काढून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न कृष्णानं केला. जन्म, यौवन आणि वार्धक्य ह्या जशा देहाच्या तीन निसर्गसिद्ध अवस्था आहेत तशीच मरण हीसुद्धा नैसर्गिकच स्थिती आहे, त्यात घाबरण्याजोगं काहीच नाही. 'देहातलं चैतन्यतत्त्व अमर आहे. जुनी वस्त्रे टाकून देऊन जितक्या सहजपणे कोणी नवी वस्त्रे धारण करतो तितक्याच सहजपणे हे चैतन्यतत्त्व एक देह टाकून दुसरा देह धारण करते म्हणजेच देह नश्वर आहे; आत्मतत्त्व अमर आहे म्हणून अलंकृत करावा तर आत्मा, देह नव्हे. प्रसाधनही मनाचं करावं, शरीराचं नव्हे. संस्कारही वाणीवर करावेत कारण वाणी आणि मन हीच आत्म्यावर संस्कार करायला समर्थ आहेत. पण त्यातही ह्या आत्मतत्त्वाचं वैशिष्ट्य असं की ते बऱ्यावाईटाचा स्वतःला लेप लावून घेत नाही, ते 'अलिप्त' असतं ! तेव्हा स्वतःच्या मृत्यूची भीती नको, तशीच दुसऱ्यांच्याही मृत्यूची नको. एकाच अमर तत्त्वावर लक्ष केन्द्रित करायला हवं ! शिवाय जन्मापासून सुरु झालेल्या आणि मृत्यूपाशी संपणाऱ्या ह्या प्रवासात सुखदुःखं, शीतोष्ण द्वंद्वं, संयोग आणि वियोग अशा अनेक

परस्परविरोधी गोष्टी वाटेत भेटणारच आहेत पण मनाचा समतोल राखून त्या पार करायलाच हव्यात कारण त्या अपरिहार्य आहेत. ते सारं सुखदायी आहे म्हणून त्यात रमायचं नाही किंवा दुःखदायी आहे म्हणून टाळायचंही नाही; स्थिरबुद्धीनं ते सोसायचं आहे. आपण कोठून आलो म्हणजेच आपली जन्मपूर्व स्थिती कोणती, आपण कोठे जाणार म्हणजे मृत्यूनंतर आपलं काय होणार हे कोणालाही ठाऊक नाही. फक्त आता प्राप्त झालेलं आयुष्यच दृश्य आहे म्हणून ह्या लहानशा आयुष्यात जमेल तेवढं चांगलं वर्तन ठेवायचं आहे. राग, लोभ, द्वेष ह्या विकारांपासून दूर राहून नियतकर्म करण्यातच शहाणपण आहे'. हा तात्त्विक विचार क्षणभर बाजूला ठेवला तरी अर्जुनासाठी पुढचा प्रश्न व्यावहारिक आहेच. 'कोण मरणार, कोण मारणार हे पुढे ठरेल पण आता एक गोष्ट निश्चितच आहे की, तू क्षत्रिय आहेस आणि अधर्माविरोधी युद्धाशिवाय अन्य काहीही क्षत्रियांकरता कल्याणकारक नाही. ह्या युद्धाचे परिणाम दोनच संभवतात, एकतर स्वतः युद्ध जिंकशील आणि पृथ्वीचं राज्य करशील, मरण ओढवलं तर स्वर्गाला जाशील, दोन्हीही गोष्टी तेवढ्याच श्रेयस्कर आहेत'. इथेही भगवन्ताची चातुरी दिसतेच. तो अर्जुनाला, 'तू जिंकशीलच' असे आश्वासन देत नाही कारण त्याच्या दृष्टीने अर्जुनाच्या भौतिक विजयापेक्षा त्याचा स्वतःच्या मनावरचा विजय अधिक महत्त्वाचा आहे. कोणत्याही कार्यात यशाची इच्छा करावी, यशासाठी प्रयत्न करावेत पण यश गृहीत धरु नये, अपयशाची तयारी हवीच म्हणून **'हतो वा - - '।** (अ. २.३७) **'मरण आलं तर'** असं सांगूनच ठेवलं, हीच समत्वबुद्धी, यालाच तत्त्वज्ञानाच्या भाषेत 'योग' म्हणतात - **'समत्वं योग उच्यते'** । (अ. २.४८) योग म्हणजे योगासने नव्हेत, योग म्हणजे केवळ श्वासप्रश्वासांवर नियंत्रण नव्हे तर योग म्हणजे समतोल विचार. पुष्कळ वेळा गीतेच्या अभ्यासकांचा एका विषयावर वितंडवाद होतो. तो विषय म्हणजे गीतेमध्ये कर्मयोग आहे की, भक्तियोग आहे की ज्ञानयोग आहे ? ह्या विद्वानांपैकी

काहीजण कोणत्या तरी एकाच योगाचा आग्रह धरतात तर कोणी अधिक चतुराईने गीतेत ह्या तीनही योगांचा समन्वय आहे असे म्हणतात. पण वर म्हटल्याप्रमाणे जर योग शब्दाचा अर्थ समतोल विचार असा केला तर भक्तियोग म्हणजे भक्तीविषयीचा समतोल विचार असा अर्थ होईल आणि मग हेही लक्षात येईल की भक्ती, ज्ञान आणि कर्म याविषयी वाद करण्याचे कारणच नाही कारण जेव्हा योग शब्दाशी संबंध येईल तेव्हा ज्ञानयोग, भक्तियोग आणि कर्मयोग अशी शब्दावली तयार होईल आणि हा जर 'भक्ति', 'ज्ञान' किंवा कर्माचा तोल साधणारा विचार असेल तर त्यात श्रेष्ठकनिष्ठभाव किंवा तरतमता रहाणारच नाही. हेही त्यावेळी सहजच लक्षात येईल की ज्ञानावाचून केलेली भक्ती आंधळी होईल (मग ती अंधश्रद्धाच असेल) तर कर्मावाचून ज्ञान लुळंपांगळं होईल कारण ते निष्क्रिय असेल. तर थोडक्यात म्हणजे गीतेमध्ये कोणता योग सांगितला आहे याचा तर्ककर्कश आग्रह धरण्यापेक्षा समविचार हाच खरा योग आहे हे समजून रहायला हवं ! कधीकधी अर्जुन हा तुमच्या माझ्यासारखाच अज्ञानी असल्यासारखे प्रश्न विचारतो. श्रीकृष्णाने सांख्ययोग, बुद्धियोग असे शब्द वापरल्यावर गोंधळून जातो आणि एखाद्या विद्यार्थ्याने जितक्या निरागसपणे शिक्षकाजवळ आपली अडचण सांगावी तितक्या सहजपणे सांगतो की, ' बाबारे, संदिग्ध अशा वाक्यांनी तू जणू माझ्या बुद्धीला मोह पाडत आहेस. कधी तुला ज्ञान श्रेष्ठ वाटते तर कधी कर्म, कधी कधी भक्ताचं एवढं कौतुक करतोस की असं वाटते की भक्तापुढे ज्ञानी किंवा कर्मयोगी तुच्छच आहेत ! तुझ्या ह्या अशा बोलण्यानं मी अगदी गोंधळून जातो. माझं कल्याण होईल असा एकच मार्ग निश्चित सांग'. **'तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्'** । (अ. ३. २). अर्जुनाच्या मनातला हा गोंधळ भगवन्ताच्या सहज लक्षात आला आणि आताच त्याला ह्यातून सावरून कर्म, भक्ती आणि ज्ञानाकडे पहाण्याची त्याची दृष्टी स्वच्छ केली पाहिजे असं त्यानं ठरविलं ! वास्तविक पूर्वी

ज्ञानाबद्दल बोलून झालं होतं, भक्तीविषयी पुढं सांगायचं आहे पण पूर्वी जे सांगितलं त्याची उजळणी आणि जे अजून सांगायचं आहे त्याची प्रस्तावना हेच खऱ्या शिक्षकाच्या शिकविण्याचं कौशल्य असतं ! श्रीकृष्णाचं स्पष्टीकरण असं की, 'ज्ञान, कर्म आणि भक्ती हे हवाबंद कप्पे आहेत असे मानू नये. ज्ञानाच्या अतिरेकाने निष्क्रिय बनू नये तर भक्तीच्या अतिरेकाने व्यावहारिक कर्माकडे डोळेझाक करु नये. ह्या प्रत्येकाचे महत्त्व आहेच पण त्यांच्या मर्यादाही आहेत. हे दोन्ही समजावून घेऊन, सारासार विचार करावा असाच गीतेचा संदेश आहे. 'अज्ञानामुळे उत्पन्न झालेला तुझ्या हृदयातला हा संशय, ज्ञानरूपी खड्गाने छेदून टाकून, निष्काम कर्माचे अवलंबन करुन युद्धाला सज्ज हो' असा मधून मधून व्यावहारिक उपदेश करणे श्रीकृष्णाने सोडलेले नाही. तत्त्वज्ञानाच्या क्रियाशून्य गप्पा कृष्णाने कधीही मान्य केल्या नाहीत. सतत क्रियाशील रहाण्याचा त्याचा उपदेश आहे. कित्येकदा असं लक्षात येतं की मन आणि शरीर यांच्या कृती फार विचित्रपणे घडून येतात. वास्तविक मन स्थिर ठेवून शरीराची क्रियाशीलता अपेक्षित असताना प्रत्यक्षात असं घडतं की शरीर क्रियाहीन म्हणजेच आळशीच रहातं आणि मन मात्र न केलेल्या क्रियेच्या फळाकडे धावत रहातं ! अर्जुनाचेही तेच झालं नाही का ? धनुष्यबाण टाकून देऊन **'न योत्स्ये'** । (अ. २.९) असं त्यानं जाहीरच केलं पण मन मात्र युद्धाच्या बऱ्यावाईट फळाचाच विचार करीत होतं ! कृष्ण त्याला परोपरीनं हेच सांगत होता की तू फक्त वर्णविहित कर्तव्य कर, त्याच्या फळाची जबाबदारी मी घेतो. मन स्थिर ठेव आणि हातपाय हलव. आपणही कित्येकदा अर्जुनासारखंच हातपाय स्थिर ठेवून मिळणाऱ्या फळाला तराजूत तोलून मनाचं स्थैर्य गमावतो. पण ही गोष्ट कळली तरी वळत नाही. गीतेचे पहिले पाच अध्यायभर योग कसा करावा हे सांगून झालं तरी अर्जुनाला अजून खात्री नाही की हे योगाचं प्रकरण आपल्याला झेपेल की नाही ? इथं मला अर्जुन आपल्या गटातलाच वाटतो.

गीतेचं तत्त्वज्ञान खूप आवडतं, थोडं फार समजतं, पण आचरणात मात्र मुळीच आणता येत नाही. अर्जुन अतिशय मोकळेपणानं सांगतो, 'हे कृष्णा, साम्यबुद्धीने प्राप्त होणारा जो हा योग तू सांगितलास तो मनाच्या चंचलतेमुळे माझ्या ठिकाणी स्थिर राहील असे मला मुळीच वाटत नाही. मन अतिशय दांडगट आणि बलिष्ठ असून वळविण्यास अत्यंत कठीण आहे. वाऱ्याला मुठीत पकडण्याइतकंच ते काम अशक्यप्राय आहे'. **'चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्'** । (अ. ६.३४). अर्जुनाच्या ह्या निष्पाप वक्तव्यावर पुन्हा एकवार हसूनच कृष्ण म्हणाला, 'हे पराक्रमी अर्जुना, हे मन चंचल आणि आवरण्यास कठीण आहे हे खरेच आहे पण कौन्तेया, अभ्यासाने आणि वैराग्याने ते स्वाधीन ठेवता येते. योग ही सहज साध्य गोष्ट नाहीच नाही पण प्रयत्नाने आणि निश्चयाने योग निश्चितच साधता येतो'. ह्या भगवन्ताच्या बोलण्यानेही अर्जुनाची सर्वसामान्य शंका फिटलीच नाही. त्याने भाबडा प्रश्न केलाच. 'जर समजा मोठ्या निश्चयाने योगाचा रस्ता चालायला सुरवात केली आणि श्रद्धा असूनही प्रयत्न कमी पडला तर प्रपंच सुटला आणि परमार्थही निसटला अशी 'न घरका ना घाटका' अशी स्थिती व्हायची ! मग अशा वेळी त्या योगभ्रष्टाचे काय होणार ? एकदा काय ते नीट सांग, माझे संशय फेडायला तुझ्याशिवाय कोणी समर्थ नाही'! अजाण बालकाच्या मनातील व्यावहारिक भीती भगवंताने नक्कीच जाणली पण त्यानं अशा प्रश्नासाठी अर्जुनाला मुळीच कमी लेखलं नाही ! उलट अत्यंत आश्वासक शब्दात केवळ अर्जुनालाच नाही तर आपणा सर्वांनाही कृष्ण सांगतो, 'बाळा, सत्कृत्य करणारा कोणीही माणूस कधीही अधोगतीला जात नाही **'न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति'**। (अ. ६.४०). ह्या उद्‌गारातील 'बाळा' हे संबोधन किती बोलकं आहे, त्यात पित्याचं पुत्राविषयीचं वात्सल्य आहे तसाच आचार्यांचा शिष्याविषयीचा अकृत्रिम स्नेह आहे, अज्ञानी जीवाला

काहीतरी कळकळीनं सांगण्याची तीव्र इच्छा आहे आणि अशा लहानसहान शब्दातून गीतेनं जो संवाद साधला आहे त्यामुळे गीतेचं तत्त्वज्ञान 'सरस' झालं आहे. असा हा योगभ्रष्ट पुनः चांगल्या पवित्र कुळात जन्म घेतो आणि पूर्वसंस्कारांचे संचित वापरून पुन्हा योगमार्गाचीच वाट चालू लागतो, ह्या जन्मात मुठीतून सुटलेलं पुढच्या जन्मात घट्ट पकडून ठेवतो. अशा अनेक प्रयत्नपूर्वक उद्योगातून परमगतीला जाऊन पोहोचतो. म्हणूनच तपस्वी, ज्ञानी या सर्वांपेक्षा कर्मयोगी श्रेष्ठ आहे; आणि अशा कर्मयोग्यांमध्येही माझ्या ठिकाणी श्रद्धा ठेवणारा अधिक श्रेष्ठ आहे'. कृष्णाच्या या शेवटच्या उद्‌गारात आणखी एक गर्भित अर्थ आहे तो जाणून घ्यायला हवा - माणसाची कोठेतरी श्रद्धा हवी - श्रद्धेय व्यक्ती हीच कर्ता करविता मानली म्हणजे मानवी अहंकार गळून पडतो - कर्मयोगी झाला तरी त्याच्या मनात अहंकार निर्माण होऊ शकतो - **'अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते'** । (अ. ३.२७) - हा अहंकार नाहीसा करायचा तर स्वतःहून श्रेष्ठ असणाऱ्यास शरण जायला हवं, अशी श्रद्धा परमतत्त्वावर ठेवली म्हणजे वैयक्तिक गुणावगुणांचीही चर्चा नकोच ! म्हणून कृष्ण सांगतो, 'श्रद्धा माझ्यावर ठेव. ह्या जगाच्या उत्पत्तिस्थितिलयाचं कारण मीच आहे. दोऱ्यात ओवलेल्या अनेक मण्यांप्रमाणे, सर्व जग माझ्या ठिकाणीच ओवलेलं आहे. प्रत्येक वस्तूला प्राणभूत अस्तित्व प्राप्त करुन देणारं तत्त्व मीच आहे हे लक्षात ठेव. पाण्यातील रस मी आहे, चन्द्रसूर्याचे तेज मी आहे, तपस्व्यांचे तप, बुद्धिमंतांची बुद्धी, बलवंतांचे बल मी आहे. एवढेच नाही तर सात्त्विक, राजस आणि तामस भावही माझ्याच आश्रयाने रहातात. माझ्या अलौकिक मायेच्या भोवऱ्यातून स्वतःची सुटका करणं सोपं नाही हे जे तू म्हणालास ते बरोबरच आहे पण मलाच शरण आलं तर ते शक्य आहे. वास्तविक दुःखपीडित, ज्ञानेच्छु, द्रव्येच्छु आणि प्रत्यक्ष ज्ञानी असे चार प्रकारचे सदाचरणी लोक माझी उपासना करतात आणि त्यांच्या इच्छांनुसार त्यांना फळही मिळते. पण माझ्या ज्ञानी भक्ताचे

वैशिष्ट्य असे की तो स्वतःच मला येऊन मिळतो. ज्याच्या त्याच्या आवडीनुसार मी देवतांच्या ठिकाणी त्यांच्या श्रद्धा स्थिर करतो, भक्तांना फळेही देतो पण खरा ज्ञानी त्या फळांना मागे टाकून तडक माझ्याच रूपात येऊन मिळण्याची आस धरतो. युद्ध, मरण, स्वर्ग, नरक हे जीवन-प्रवासातील केवळ टप्पे आहेत. त्यांच्या पलिकडे काहीतरी आहे आणि तेच मिळवायचे आहे हे लक्षात ठेव. हेच खरे ज्ञानविज्ञान आहे. मन आणि बुद्धी मलाच अर्पण करुन केलेली कर्मे बंधक होत नाहीत. लढाई करुनही तू त्या फळांपासून स्वतःला दूर ठेवून मलाच येऊन मिळशील पण लढाई टाळणे हे कोणत्याही कारणास्तव समर्थनीय नाहीच. शिवाय हे जे सारं मी सांगतोय ते ह्या लढाईपुरतं किंवा तुझ्यापुरतंच नाही. खरं तर हा आयुष्यातल्या प्रत्येक लहानमोठ्या द्वंद्वांच्या निराकरणाचा उपाय आहे. असा हा ज्ञानी माणसाचा कर्मयोग हे पुनर्जन्म टाळण्याचं एकमेव साधन आहे. ह्या जगात चराचराचे निर्माण होणे व विलय पावणे ही एक अखंड प्रक्रिया आहे. मानवी जीवांचेही तसेच आहे. पण फक्त एकच स्थान असे आहे की जेथे पोहोचले असता पुन्हा परतावे लागत नाही -**'यं प्राप्य न निवर्तन्ते तद् धाम परमं मम'** । (अ. ८.२१) किंवा **'यद् गत्वा न निवर्तन्ते तद् धाम परमं मम'**। (अ.१५.६) ते माझे परमधाम आहे. हे वेद-वेदान्त, यज्ञ, तप आणि दान ह्या सर्वांच्या पलिकडे आहे, तेच मानवाचे एकमेव प्राप्य असायला हवे.

गीतेकडून मला आणखी एक मोलाचा उपदेश मिळाला आहे. ७०० श्लोकांच्या गीतेचं सार केवळ दोन शब्दांत सांगायचं झालं तर मी म्हणेन ते दोन शब्द आहेत **'मन्मना भव'** असे आहेत. त्यांचा अर्थ 'माझ्या ठिकाणी लक्ष केन्द्रित कर' असा आहे. आपण दिवसभर जे काही काम करीत असतो ते प्रत्येक काम आपल्याला हेच सांगत असते की, 'आता माझ्याकडे लक्ष दे'. ऑफिसमध्ये काम करीत असताना घराची चिंता नको, घरात

काम करताना ऑफिसचा विचार नको. जे हातात आहे तेच मनात असू द्या, तरच काम व्यवस्थित होणार आहे. कोणतेही काम, काम म्हणून कसं चांगलं होईल हे पहायला हवं, त्यापासून मला काय लाभ होईल हाच विचार मनांत राहील तर काम चांगलं होणार नाही. कामाला सुरवात करण्यापूर्वी त्याच्या फळाचा जरुर विचार करावा, ते फळ सात्त्विक, दुसऱ्याला हानी न पोहोचविता मिळणार असेल तर काम अवश्य हाती घ्यावं, पण एकदा का कामाला सुरवात केली की फळावरची नजर काढून घ्यावी. 'तुझा अधिकार फक्त काम करण्याचा आहे, तो फळावर नाही' - **'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'** । (अ. २.४७) असा श्रीकृष्णाचा उपदेश आहे. काम हातात आणि फळच मनात राहील तर साध्य दूर जाईल हा विचार म्हणजेच खरा निष्काम कर्मयोग. अर्जुनाला निमित्त करुन व्यासांनी खरं तर गीता आपल्या सर्वांसाठी सांगितली आहे. अगदी आहारापासून आत्मज्ञानापर्यंत सर्व विषयांसंबंधी मार्गदर्शन त्यांनी केलं आहे. यज्ञ, दान, तपापासून मोक्षापर्यन्तच्या प्रवासात उपयोगी पडेल एवढी शिदोरी गीतेच्या रुपाने आपल्या हाती दिली आहे. सात्त्विक, राजस आणि तामस वृत्ती प्रत्येकाच्या ठिकाणी असतातच, त्यांचे अंश कमी जास्त असतात एवढंच ! त्यातही सात्त्विकता सर्वश्रेष्ठ असते कारण ती ईश्वराच्या जवळ घेऊन जाते. राजसवृत्ती म्हणजे क्रियाशीलता, उत्साह पण तामसवृत्ती मात्र निंद्य, कारण तिच्यात अशुद्धी आहे, परहितहानी आहे. तेव्हा आपल्यातील तामसी वृत्ती काढून टाकून क्रियाशीलता न टाकता, सात्त्विक वृत्तीने वागणे हाच खरा मोक्ष होय. मोक्ष ही कोणतीही वस्तू नव्हे की जी बाहेरून खरेदी करायची आहे किंवा मोक्ष हे काही कोठे जाण्याचं ठिकाण नाही की ज्याच्या प्रवासाची तयारी करावयाची आहे, मोक्ष म्हणजे मानवी मनाचं शुद्ध समाधान ! हे आपण जागच्याजागी बसवूनच मिळवू शकतो. जे काम विचारपूर्वक हाती घेतलं आहे ते जास्तीत जास्त चांगलं करुन स्वतःला आणि दुसऱ्यालाही आनंदी करणं हाच खरा

मोक्ष ! स्वतःच्या उपजीविकेपुरते उत्पन्न मिळाल्यावर अधिकाचा मोह न करता दुसऱ्यांसाठीही काही करावं ! 'उरलो उपकारापुरता' ही तुकारामाची भावना आणि गीतेचा लोकसंग्रह एकच ! 'मी आणि माझं' यांतून बाहेर पडून 'तो' आणि 'त्याचं' असा भाव मनात राहील तेव्हाच आपला दृष्टिकोन विशाल होईल. मी-तूपण लयाला जाणं ते हेच. हीच निर्व्याजता, नम्रपणा माणसाला देवत्वाकडे नेतो. देवपण ह्याच जगात भोगता येईल, त्यासाठी स्वर्गाची वाट पहायला नको. माणूस जेव्हा आपल्या वागणुकीनं आदर्श होतो तेव्हा तोच देव असतो. आपल्या कार्याला ईश्वराचं अधिष्ठान लाभलं की ते कार्य यशस्वी होणारच. मी जे जे बोलेन ती तुझीच स्तोत्रे असतील असं एकदा ईश्वरापाशी कबूल केलं की तोंडून अपशब्द जाणारच नाही. मी जे जे खाईन तो तुलाच नैवेद्य असेल असं म्हटलं की अभक्ष्यभक्षणाची इच्छाच होणार नाही. म्हणूनच कृष्ण सांगतो, **'मन्मना भव मद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरु'** । (अ.९.३४; १८.६५) हीच भक्तीची पराकाष्ठा आहे. अशा प्रकारे कर्म, ज्ञान आणि भक्ती ही तीन रत्ने गीतेनं आपल्या हाती दिली आहेत. त्यांनी आपण कसं सुशोभित व्हायचं ते आपलं कौशल्य आहे.

भगवन्ताच्या मुखातील आणखी एक वचन मला नेहमीच आश्वासक वाटत आलं आहे. 'जे अनन्य भावानं माझं चिन्तन करीत मला भजतात त्या नेहमी मला एकनिष्ठ अशा पुरुषांचा योगक्षेम मी चालवितो'. **'तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्'** । (अ. ९.२२) ह्या श्लोकातूनही हीच गोष्ट स्पष्ट आहे की, 'देव भावाचा भुकेला' ! त्याच्यावर आपल्या कामाचं फळ सोपवून आपण निश्चिंत रहावं ! याचा अर्थ असा नव्हे की, पोट भरण्यासाठी कामधंदा न करता हातात माळ घेऊन कृष्णनामाचा जप करावा आणि जेवणाच्या वेळी भरलेलं ताट समोर येईल याची वाट पहावी

- हा तर नामाचा बाजार झाला पण अगदी साधी साधी रोजची कामं सुद्धा त्याची आणि त्याच्यासाठी आहेत अशा निष्ठेनं करावीत म्हणजे फळाची चिन्ता भेडसावणार नाही. कोणत्याही देवतेच्या पायी निष्ठा वाहिली तरी ती त्याच्यापर्यन्त पोहोचतेच. पत्र, पुष्प, फल, तोय यातलं काहीही त्याला भक्तिपूर्वक अर्पिले तरी तो ते प्रेमाने स्वीकारतोच. आपलं खाणं, पिणं, तप्र सारं काही त्याला वहा. याच अर्थानं शंकराचार्यांनी शंकराची मानसपूजा करताना म्हटलं आहे, **'यद् यद् कर्म करोमि तद् तद् अखिलं शम्भो तवाराधनम्'।** गीतेनं कधीच कर्मसंन्यास सांगितला नाही, सांगितला तो कर्मफलसंन्यास !

या कर्मफलसंन्यासाचा संबंध सगुणभक्तीशी आहेच. ईश्वराच्या सगुण स्वरूपाची उपासना श्रेष्ठ की निर्गुण ब्रह्माची ? या प्रश्नावर कृष्णानं दिलेलं उत्तर मार्मिक आहे. अव्यक्त ब्रह्माची उपासना श्रेष्ठ असली तरी ती सामान्यांच्या आवाक्यातील नाही; ती अतिशय क्लेशकारक आहे. सगुण ब्रह्माची उपासनासुद्धा कर्मे त्यालाच अर्पण करुन केली तर जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सोडविते. मन आणि बुद्धी त्याच्याठिकाणी ठेवणं बोलण्याइतकं सोपं नाही. त्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करावा लागेल. ते जर जमलं नाही तर कामे त्याच्यासाठी करुन कर्मफलापासून मुक्त रहा. अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे, ज्ञानापेक्षा ध्यान श्रेष्ठ आहे, पण ध्यानापेक्षाही कर्मफलत्याग अधिक श्रेष्ठ आहे. कोणता भक्त त्याला आवडतो हे जे त्यानं सांगितलं ते खरं तर सदाचरणी पुरुषाचंच वर्णन आहे. निरपेक्ष, अंतर्बाह्य पवित्र, कर्तव्यजागरुक, अनासक्त असा भक्त म्हणजेच खरा 'आर्य'- ***(The person of noble conduct)***. भक्तिमान, निन्दास्तुतीकडेही सारखंच पहाणारा, आणि ह्या अमृततुल्य धर्माचे आचरण करणाराच त्याचा आवडता भक्त आहे.

गुह्यतम तत्त्वज्ञानाबरोबरच गीता हे एक दृश्यकाव्य (***visual poetry***) आहे. प्रत्येक चर आणि अचर गोष्टीतलं जे एक शाश्वत तत्त्व ती 'विभूति' होय आणि ते तत्त्व मीच आहे हे सांगताना भगवन्ताने जे वर्णन केले ते ऐकले किंवा वाचले म्हणजे प्रत्येकाच्या मनःपटलावर ईश्वराच्या ऐश्वर्याचे एक सोज्वल चित्र उमटते. हीच प्रतिमा मनावर कायमची कोरली तर मनातील किल्मिष नाहीसे होऊन मनही तरल बनते आणि त्या ऐश्वर्याशी एकरूप बनते. 'आदित्यांमधला मी विष्णू आहे, तेजस्वी ग्रहगोलांमधला सूर्य आहे, मरुतांमधील मरीची आहे, नक्षत्रांमधला मी चंद्र आहे, रुद्रांमधील शंकर आहे, देवतांमधला इन्द्र आहे, वृक्षांमधला अश्वत्थ आहे, पर्वतांमधला हिमालय आहे. प्रत्येक पदार्थांमधले जे वैभव, जी शोभा तो माझ्याच तेजाचा अंश आहे'. हे कृष्णाचं वचन सत्यशिवसुंदराचा साक्षात्कारच घडवितं. तुमच्या माझ्यातलं जे काही चांगलं आहे ते 'तो' आहे मग त्याच्या निवासाजवळ आपण आपल्या प्रकृतिज दुर्गुणांशी काजळी कशी पसरावी ? प्रयत्नपूर्वक ही अशुद्धी दूर करायलाच हवी. ह्या विभूतियोगाखेरीज आणखी एक थक्क करणारं असं भगवन्ताचं रूप गीतेत आहे; ते म्हणजे 'विश्वरूप'. हे पहायला एकतर यशोदा तरी व्हावं, नाहीतर संजय किंवा अर्जुन तरी ! यशोदेनं कृष्णाच्या बाळमुखात विश्वरूप पाहिलं तर अर्जुनासाठी देवानं ते मुद्दाम धारण केलं, व्यासांच्या कृपेनं ते संजयाला दिसलं आणि तो रोमांचित झाला पण आपण या तिघांपैकी कोणीही नाही म्हणूनच आपण दीर्घ प्रयत्न करायला हवा ! ह्या विश्वरूपाचं शब्दचित्रच गीतेनं रेखाटून दिलंय तेच पुन्हा पुन्हा वाचायचं आणि नजरेसमोर आणायचं ! हे रूप थरारणाऱ्या अग्निज्वालांप्रमाणे भयकारी आहे, पसरलेल्या जबड्यात प्रवेश करणाऱ्या लोकांचे हे दृश्य खरोखर मनाला कापरं भरविते - ते रौद्र रूप पाहून अर्जुन घाबरला आहे. भयंकारी सत्याच्या साक्षात्दर्शनानं गडबडला आहे. ते उग्र

तेज सहन न झाल्यानं पुन्हा शान्त व सौम्य अशा मूळ रूपाला ये म्हणून कृष्णाला विनवीत आहे. सद्गदित कण्ठाने तो म्हणतो, 'अरे कृष्णा, तुझ्या गुणवर्णनाने सज्जनांना आनन्द होतो आणि दुर्जन दशदिशात पळ काढतात हे योग्यच आहे. मी देखील तुझं मोठेपण न समजल्यामुळे तुला बरोबरीचा मित्रच मानलं पण आता क्षमा कर'. त्यानंतर त्या अदृष्टपूर्व रूपातून कृष्णानं पुन्हा सौम्य रूप धारण केलं. ते नेहमीच्या परिचयाचं सौम्य रूप पाहून अर्जुन मनोमन शान्त झाला. आणि जे काही विवेचन आतापर्यन्त कृष्णानं केलं त्यावर तो विचार करु लागला. अर्जुनाच्या मनाची चांगली तयारी झाल्याचं लक्षात आल्यावर आता उपदेशाच्या शेवटच्या टप्प्याशी कृष्ण आला. 'इतकं सगळं मी तुला सांगितलं, शास्त्रानुसार कर्तव्या-कर्तव्यतेचा निर्णय तू करायचास, पण एक आश्वासन देतो - मला शरण ये, मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करेन. शोक करु नकोस'. **'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः'** ।। (अ. १८.६६). पुन्हा शेवटी विचारलं, 'हे पार्था सांगितलेलं सगळं नीट ऐकलंस ना ? अज्ञानमोह नष्ट झाला ना ?' यावर अत्यंत समाधान पावलेल्या अर्जुनाने कबूल करुन टाकलं, 'हे कृष्णा, तुझ्या कृपाप्रसादाने माझ्या मनातील मोह पूर्ण नाहीसा झाला. मला माझ्या कर्तव्याची स्मृती उत्पन्न झाली, आता तुझ्या सांगण्याप्रमाणे युद्ध करीन'. **'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्-मयाऽच्युत । स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव'** ।। (अ. १८.७३)

अर्जुनाचा कर्तव्यविषयक भ्रम दूर झाला तसाच तो कृष्णकृपेने माझा व तुमचाही होवो हीच त्याचे चरणी प्रार्थना ! हे जे थोडेफार सांगितलं ते त्याच्याच आज्ञेनं, माझं पांडित्य दाखविण्यासाठी नाही. त्यानंच गीताख्यान संपविताना म्हटलं होतं की, 'गीतेचं तत्त्वज्ञान जो लोकांना सांगेल तो माझा आवडता होईल'. म्हणून हे तुम्हा सर्वांना सांगून त्याचं त्यालाच अर्पण !

'त्वदीयं वस्तु गोविन्द तुभ्यमेव समर्पये ।
प्रसन्नस्त्वं जगन्नाथ प्रीत्या मोदेन स्वीकुरु' ।।

## गीतावन्दना

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीम्
अम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।

पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगंधोत्कटं
नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् ।
लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा
भूयात्भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ।।

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

卐 卐 卐



**श्री व्दारकाधीश मंदिर**
**साईहरीक्षेत्र, आपटा फाटा, कर्नाळा, जि. रायगड.**

सेवा सादर केली आहे.

द्वारकाधीश मंदिराच्या व्यवस्थापनासाठी श्रीद्वारकाधीश चॅरीटीज हा विश्वस्त निधीन्यास स्थापन करण्यात आला असून तो मुंबई सार्वजनिक विश्वस्तनिधी कायद्याखाली नोंदवण्यात आला आहे. या न्यासामार्फत आजवर अनेक समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व गणवेशाचे वाटप केले जाते. गरजूंना औषधोपचारासाठी, शस्त्रक्रियांसाठी आर्थिक मदत दिली जाते.


भविष्यकाळात द्वारकाधीश मंदिरास लागून असलेल्या जागेत एक भव्य 'गीताभवन' बाधण्याची योजना असून या वास्तूत एकाच वेळी शेकडो विद्यार्थी गीतापठण करू शकतील तसेच यज्ञयागादी कार्येही गीताभवनात सिध्दीस नेता येतील. पंचक्रोशीतील गरजूंसाठी मोफत वैद्यकीय सेवा / चिकित्सा यासाठी चिकित्सालयाची उभारणी करण्यात येणार असून आयुर्वेद, होमिओपथी व ॲलोपथी या शाखांमधील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत सल्ला व औषधोपचार उपलब्ध करून देण्याची योजना आहे. या शिवाय भारतीय संस्कृती व इतिहास विषयक शैक्षणिक प्रकल्प हाती घेण्याचाही मानस आहे. अर्थातच या कार्यासाठी लागणारा निधी द्वारकाधीशाच्या कृपेने व आशिर्वादाने उभा राहील व त्याच्या भांडारातूनच ही समाजपयोगी कार्ये साकार होतील असा विश्वास वाटतो. सर्व कृष्ण भक्तांचे प्रेम, सहकार्य आणि सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

**अजित कारखानीस**



डॉ. उमा वैद्य

डॉ. उमा वैद्य म्हणजेच पूर्वाश्रमीची सुषमा रानडे, ही माझी सहाध्यायिनी. संस्कृतमध्ये 'पाणिनी' च्या व्याकरणशास्त्रावर डॉक्टरेट केल्यानंतर गेली अनेक वर्षे मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात संस्कृत विभागाची प्रमुख म्हणून काम पहाते. विद्यावंताने किती विनम्र आणि विनयशील असावं याचं लेखिका हे मूर्तिमंत उदाहरण होय. ''आजच्या युगातला गीतेचा अन्वयार्थ' हा तिने लिहिलेला एक छोटासा लेख माझ्या वाचनात आला. अत्यंत सोप्या व सरळ भाषेत सर्वसामान्यांना भगवान् श्रीकृष्णाची गीतेतील शिकवण समजावून सांगण्याचा तिचा तो प्रयत्न मला आवडला. हे विचार थोडे विस्तृत स्वरुपात मांडल्यास पुस्तिकेच्या रूपात ते प्रसिध्द करता येतील असे मी सुचविल्यानंतर तिने भगवान् व्दारकाधीशाची सेवा म्हणून माझ्या सूचनेचा आनंदाने स्वीकार केला. 'वासुदेववाग्वेणू' ('श्रीकृष्णाची वाणीरुप बासरी') - या पुस्तिकेच्या रूपाने तिची ही सेवा कृष्णभक्तांपुढे सादर करताना खरोखरंच आनंद होतोय. या पुस्तिकेच्या अखेरीस 'त्याचेच त्याला अर्पण या अर्थाच्या श्लोकातूनही ''किंबहुना तुमचे केले । धर्मकीर्तन हे सिध्दी नेले । तेथ माझे जे उरले पाईकपण ।।'' ही ज्ञानेश्वर माऊलींनी व्यक्त केलेली भावनाच पुनर्प्रतीत होते. भगवान् व्दारकाधीशाने लेखिकेची ही सेवा आपल्या चरणी रूजू करून घेऊन समाजप्रबोधनाच्या कार्याची तिला उत्तरोत्तर अशीच प्रेरणा द्यावी हीच त्याचे चरणी प्रार्थना !



**अजित कारखानीस** विश्वस्त
**श्री व्दारकाधीश चॅरिटीज**

website : www.sridwarkadhish.com